# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ३०३/२०२४ दिनांक- १६/०८/२०२४.

## "खुनाच्या गुन्हयातील ०६ वर्षापासुन फरार आरोपीतास जेरबंद करण्यास तुळींज गुन्हे प्रकटीकरण पथकास यश"

दिनांक ०३/०५/२०१८ रोजी नालासोपारा पुर्व, मोरेगाव तलाव ते मनवेलपाडा तलाव, विरार पुर्व कडे गेलेल्या ९० फुट रोडवर रस्त्याचे कडेला इसम नामे प्रविण ऊर्फ सोनु गोविंद साखरिया वय २२ वर्षे रा.नागरीक कॉलनी रु.नं. ४०१ मोर्या नगर मोरेगाव ना.सो.पुर्व यास यास कोणत्यातरी हत्याराने डोक्यात तसेच तोंडावर मारुन गंभीर जखमी करुन त्यास जिवे ठार मारले म्हणुन तुळींज पोलीस ठाणे गु.रजी.नं. ४७०/२०१८, भा.दं.वि.सं कलम ३०२, ३६४, २०१, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हाचे तपासात सदरचा गुन्हा आरोपीत नामे १) भरत मुंकुद राय वय २५ वर्षे रा.बी/२०४, शशिकांत अर्पा डॉनलेन आचोळे नालासोपारा पुर्व २) आशिष अजित कुलकर्णी वय - २९ वर्ष रा. बि/०५, रिध्दरविनायक अपार्टमेंन्ट, नालसोपारा पुर्व ३) निशांत मनोजकुमार मिश्रा ऊर्फ मोनु रायडर वय- २९ वर्ष राहणार अे/२०३ उर्वशी अपार्टमेन्ट, नालासोपारा पुर्व ता.वसई ४) प्रिन्स धनंजय सिंग ऊर्फ पोगो रा. वृंदावन चाळ रु.नं. ०२ सी विंग ठाकुर नगर नालासोपारा पुर्व यांनी केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. सदर गुन्हयता आरोपीत क्रामंक ०१ ते ०३ यांना तात्काळ अटक करण्यात आली होती, सदर गुन्हा घडलेपासुन आरोपीत नामे प्रिन्स धनंजय सिंग ऊर्फ पोगो हा फरार होता.

गुन्ह्यतील पाहिजे आरोपीत प्रिन्स धनंजय सिंग ऊर्फ पोगो याचा शोध घेवुन त्यास अटक करणेबाबत वरिष्ठांनी आदेशित केले होते. तेव्हापासुन पाहिजे आरोपीत हा त्याचे अस्तीत्व लपवुन विरार, अंबरनाथ, उल्हासनगर, ठाणे, नवी मुंबई येथे वास्तव्य करित असल्याचे गुप्त बातमीदाराकडुन माहिती प्राप्त झाली होती. सदर आरोपीत याचा मागोवा काढत असताना, दिनांक १५.०८.२०२४ रोजी पाहिजे आरोपीत हा विरार कातकरी पाडा येथे असल्याची गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली होती. प्राप्त माहितीनुसार विरार कातकरी पाडा येथुन पाहिजे आरोपीत नामे प्रिन्स धनंजय सिंग ऊर्फ पोगो रा. जे- ५५/७०२ रुस्तुमजी ग्लोबल सिटी विरार प. ता. वसई जि.पालघर यास ताब्यात घेवुन, त्याचा सदर गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक १६.०८.२०२४ रोजी अटक करण्यात आली असुन, सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनिरी/ वाय. एस. खैरे हे करित आहेत.

सदरची कामगीरी श्री. पौर्णिमा चौगुले-श्रींगी पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री. उमेश माने-पाटील सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/सुनिल पवार, सफौ/शिवानंद सुतनासे, पो.हवा/आनंद मोरे, वरठा, राजेंद्र जाधव, अशपाक जमादार, पांडुरंग केंद्रे ,पोशि/ईस्माईल छपरीबन, राहुल कदम, शशिकांत पोटे, तसेच पोलीस उपआयुक्त कार्यालय परिमंडळ ०२ वसई येथील पोहवा/बागुल व पोशि/ अमोल बर्डे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

-------------00000------------